# Adult Community की वृध्दाश्रम

मध्यंतरी Club-55 तर्फे community living वर एक seminar झाला. त्याला मिळालेल्या प्रतिसादावरुन हा एक निकडीचा विषय आहे असे दिसून आले. म्हणून आम्ही तेथे सादर केलेले विचार पुन्हा येथे संक्षिप्तपणे सादर करतो. ह्याबाबतीत, तुम्हाला तुमचा निर्णय घेण्यात त्याचा - विषेशत: आमच्या प्रत्यक्ष अनुभवांचा - उपयोग होईल अशी आशा करतो.

**हे स्थलांतर का करायचं?**

२००८ साली बर्नार्डसव्हिल मधील ऐसपैस घर व आवार सोडून सॉमरसेट मधे कनॉलवॉक ह्या गेटेड ॲक्टिव्ह ॲडल्ट कम्युनिटीत राहायला आलो. आमच्या ह्या निर्णया मागील कारणमीमांसा थोडक्यात सांगतो. वयापरत्वे, गरजेपेक्षा मोठ्या घराची देखभाल/डागडूजी, गवत कापणे, हिवाळ्यात वाळकी पाने गोळा करणे/स्नो काढणे, इत्यादि कठीण वाटू लागले होते. बेडरूम तळमजल्यावर असावी, आजुबाजुला चाहुल असावी असेही वाटू लागले होते. शिवाय, वार्धक्य आल्यावर अपघात किंवा भुरट्या चोऱ्या (vandalism) विरुध्द काही तरतूद असावी ही जाणीव सुध्दा होऊ लागली होती. महिना दोन महिने (भारत) प्रवास करायचा म्हटला तर हा मुद्दा अधिकच महत्वाचा वाटला.

**ह्या स्थलांतरासाठी योग्य वेळ कोणची?**

तरूण वयात स्थलांतर करतांना खूप हुरूप व नव्या वास्तु बद्दल आस्था/आपुलकी असते. मात्र ह्या स्थलांतरा बद्दल, त्यामागील कारणांमुळे, निरुत्साह व अनास्था वाटण्याचा धोका असतो. त्यातून उद्भवणाऱ्या संभाव्य तोट्यांचे विवेचन पुढे येईलच.

हा तोटा टाळण्याचा एक उत्तम उपाय म्हणजे हे स्थलांतर "आवश्यक" होईपर्यंत न थांबणे. दुसऱ्या शब्दांत, नवी वास्तु म्हणजे एक nursing home किंवा वृद्धाश्रम आहे ही भावना नसावी. (Adult Community त जायला, मी काही म्हातारा झालेलो नाही, वगैरे, वगैरे!) आपण तिथे निदान दहाएक वर्षे तरी धडधाकटपणे जगणार आहोत अशी आशादायी वृत्ति फायदेशीर ठरेल. (धडधाकटपणा म्हणजे काय ह्याचा विचार पुढे सुविधांची निवड करतांना होईलच.) तशा दृष्टीने साठी उलटता उलटता आम्ही हालचाल सुरु केली. शिवाय जुनं घर विकल्या शिवाय नवीन घरात पैसे गुंतवायचे नाही असा आम्ही निर्णय घेतला होता. त्याचा परिणाम म्हणजे निदान ४/६ महिने तरी भाड्याच्या घरात राहण्याची तयारी ठेवावी लागणार होती. पर्यायाने सामान storage मधे ठेवणे आलेच.

**उष्ण हवेच्या शोधात**

आमच्या मित्रमंडळींच्या अनुभवावरुन, थंडीचे ४/६ महिने (जमल्यास कायमचेच) भारतात आणि उरलेले महिने इथे राहाण्याची कल्पना आम्हाला नेहेमीच आकर्षक वाटत असे. पण, नुकतेच प्रत्यक्षात भारतात जाऊन आल्यावर साक्षात्कार झाला की आमच्या स्मृतीतील भारत प्रत्यक्षात फार बदलला आहे आणि ह्या बदलाशी पुन्हा जुळवून घेणे - तेही उतार वयात - बरेच कठीण जाणार आहे. बहुतेक सर्व ओळखीची मंडळी वयापरत्वे विखूरलेली असल्याने, दिवसभर करायचे काय असा ही प्रश्न निर्माण झाला. शिवाय, तेथील डॉक्टरांशी ओळखी नसतील तर वैद्यकीय उपचारात किती हलगर्जी होऊ शकते ह्या बद्दल बरेच काही ऐकले होते. म्हणून तो विचार आम्ही रद्द केला.

भारतात नाही तर निदान Florida किवा तत्सम उष्ण हवेच्या जागी स्थायिक होणे शक्य होते. पण प्रत्यक्ष निर्णय घेण्याची वेळ आली तेंव्हा आमच्या खऱ्या मर्यादा व

गरजांची जाणीव झाली: गेली ४३ वर्ष New York मध्ये किंवा परिसरात राहिल्याने किंवा आमच्या नोकऱ्यांच्या स्वरुपामुळे म्हणा, ह्या वात्‌ावरणाची (Cultural activities, sports events, Broadway plays, इत्यादि) बरीच सवय झाली असल्याची जाणीव झाली. नव्या जागी पुन्हा पाळेमूळे रुतेपर्यंत (म्हणजे कमीतकमी भारतीय सिनेमा, पत्ते, इत्यादित आवड वाढेपर्यंत) दिवसभर करायचे काय असा प्रश्न निर्माण झाला. त्या अनुषंगाने, आमच्या आत्मस्वातंत्र्याच्या व पर्यायाने स्वावलंबनाच्या रुपरेषा जास्त स्पष्ट झाल्या.

त्यानंतर, नातवंडांच्या ओढ्यामुळे आमच्या एकुलत्या एक मुली जवळ राहाण्याचे स्वप्न बघू लागलो. पण लवकरच लक्षात आले की “Ajoba I love you” चे “Hi Ajoba, bye Ajoba” व्हायला फारसा वेळ लागत नाही. शिवाय, मुलांच्या आयुष्यात अवास्तव ढवळाढवळ होण्याची शक्यताही वाढते. तेंव्हा, मुलांच्या फार जवळ नसलेल बरं ह्याची जाणीव झाली. शिवाय, नोकरी निमित्त जावयाचे स्थलांतर होण्याची शक्यता होतीच! तेंव्हा, सध्याचे १५० मैल अंतर फार नाही आहे असे ठरवून, न्यूजर्सीतच स्थाईक व्हायचे आम्ही ठरवले.

अशा तऱ्हेने, ह्या Retirement Home प्रकल्पात बऱ्याचशा लहानमोठ्या romantic कल्पनांना धक्के बसले. बहुधा, तुम्हालाही असे अनुभव येतील!

**घराच्या परिसराची निवड**

भर वस्तीत एक लहान घर घेऊन आवारातील कामे, एकलेपण, इत्यादि अडचणी आवाक्यात आणता आल्या असत्या. पण वाढत्या वयाचा विचार करता, ह्या अडचणींचा पूर्ण नायनाट करणे जास्त योग्य वाटले. Condominium हा दुसरा पर्याय होता. परंतु, प्रशस्त घरातून एकदम Apartment मधे जायची कल्पना धाडसाची वाटली. तसेच भुरट्या चोऱ्या(vandalism) आणि शेजाऱ्यांचा कटकटीचा

प्रश्न होताच. शिवाय, घरा भोवती थोडे तरी आवार असावे अशी आमची फार इच्छा होती. त्यामुळे Community living सर्वात आकर्षक वाटले.

ॲडल्ट कम्युनिटीची निवड करतांना आम्ही खालील गोष्टींचा विचार केला:

- नामांकित बिल्डर: बिल्डर चांगला असला की जागा निवडतांना, तो zoning, land fill, flood zone, इत्यादिंचा नीट विचार करतो. बांधकामांत हलगर्जी नसते व Subcontractors सुद्धा चांगल्या दर्जाचे असतात. त्यामुळे नंतर कटकट कमी असते. तसेच, घरांचे layouts विविध आणि जास्त आकर्षक असतात.
- दैनंदिन जिवनाच्या सुकरतेसाठी, Grocery Store, Pharmacy, Laundry, Gas Station/Garage, इत्यादि 3 -4 मैलांत असावे. तसेच, Hospital, Airport, Shopping Mall, इत्यादि १०-१५ मैलांत असावे.
- आमच्या आवडींनुसार Swimming Pool व Tennis ह्या मुख्य अंतर्गत सुविधा आम्हाला हव्या होत्या.

**गेल्या ४ वर्षातील अनुभव:**

खरे तर अनुभव फार वैयक्तिक असतात. तरीपण सामान्य स्वरुपाची निरिक्षणे इथे उद्धृत करतो. Grocery Store, Pharmacy, Laundry, Gas Station/Car Garage, Hospitals, Movie Theater, Shopping Malls, इत्यादि, जवळपास असल्याने खूप सोयीचे झाले आहे. आजूबाजूला निरनिराळ्या Restaurants ची चंगळ असल्याने, अगदी शेवटच्या क्षणी ठरवूनही चांगल्या Restaurant मधे जाता येते. त्यामुळे आमचे बाहेर जेवणाचे प्रमाण बरेच वाढले आहे.

५ Acre जागेतून १/४ Acre जागेत आल्यामुळे सुरवातीला गुदमरल्यासारखे वाटले. पण त्याची हळूहळू सवय झाली. दुसरी गोष्ट खटकली ती घराभोवती कोणतेही

बदल करण्यापूर्वी, असोसिएशनची परवानगी घ्यावी लागते. साधा Bird Feeder सुध्दा ठेवता येत नाही. पण या नियमांमागील भूमिका कळल्यावर त्याची उपयुक्तता पटली.

कनॉलवॉक मधे Indoor & Outdoor Swimming Pools आणि Tennis courts आहेत. येथील प्रशस्त Club House मधे निरनिराळे कार्यक्रम आखण्यासाठी एक Activity Manager नेमला आहे. त्याचे मुख्य काम म्हणजे रहिवाश्यांना आवडतील अशा activities सादर करायच्या. उदाहरणार्थ, Pizza Parties, Standup Comedies, Bridge/Poker Card Games, Chess, Billiards, Table Tennis, Trips to New York/Atlantic City. त्या कार्यक्रमात भाग घेतल्यास लोकांच्या ओळखी होण्य़ास मदत होते. पण सर्वात आनंदाश्चर्याची घटना म्हणजे लोकांचा मनमोकळेपणा! “आपण सर्व एकाच बोटीत आहोत” ही भावना प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे, आढ्यता फार कमी! ओळख असो वा नसो, एकमेकांना हास्यमिश्रित अभिवादन हटकून असते. एकदा Sump pump थांबल्यामुळे आमच्या basement मधे पाणी आल्याबरोबर आमचे शेजारी धाऊन आले.

अर्थात हा मैत्रीचा ओघ टिकवण्यासाठी प्रत्येकाने त्यात भर घालणे आवश्यक आहे. म्हणून आम्हीही येथील कार्यक्रमांत शक्यतो भाग घेण्याचा शक्यतो प्रयत्न करतो. तुमचा आशावादी दृष्टिकोन असेल तर हे आपोआपच जमते. त्यासाठी, वर म्हटल्याप्रमाणे, नवी वास्तु म्हणजे एक nursing home किंवा वृद्धाश्रम आहे असा दृष्टिकोन टाळणे आवश्यक आहे. “Glass is half full” असा जीवनाचा दृष्टीकोन ठेवल्यास तुमचे Adult Community तील जीवन पुष्कळ जास्त सुखदाई होईल असे आम्ही स्वानुभवावरुन सांगू शकतो.

Good Luck and Best Wishes!

साधना आणि शरद साठे